# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.06.2025** **वारःशुक्रवार**

---

1. अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे निर्देश-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा
2. अहमदाबाद विमान दुर्घटनेबद्दल संपूर्ण देशासह जगभरातून तीव्र शोक व्यक्त
3. इस्रायली हवाई दलाचे इराणवर हल्ले; इस्राइलमध्ये आणीबाणी जाहीर आणि
4. महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये जोरदार पावसाचा तर उत्तरेत उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**<u>विमान दुर्घटना</u>**

गुजरातमध्ये अहमदाबाद इथं काल दुपारी एअर इंडियाचं एआय-171 हे प्रवासी विमान रहिवासी भागात कोसळलं; विमान दुर्घटना अन्वेषण विभागानं या दुर्घटनेची चौकशी सुरू केली आहे. आंतरराष्ट्रीय नागरी विमान संघटनेनं ठरवलेल्या प्रक्रियेनुसार ही चौकशी केली जाईल, असं नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितलं. या विमानात प्रवासी आणि कर्मचारी मिळून 242 जण होते. त्यामध्ये 169 भारतीय नागरिक, 53 ब्रिटिश नागरिक, पोर्तुगालचे 7 नागरिक आणि कॅनडाच्या एका नागरिकाचा समावेश होता. या अपघातात विमानंतल्या 241 लोकांचा मृत्यू झाला असल्याचं एयर इंडियानं सांगितलं. अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला एक कोटी रुपयांची मदत टाटा समूहाचे अध्यक्ष एन चंद्रशेखरन यांनी जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे जखमींचा संपूर्ण वैद्यकीय खर्च टाटा समूह करणार आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही मृतांमध्ये समावेश आहे. तसंच अपर्णा महाडीक, दीपक पाठक, मैथिली पाटील या महाराष्ट्रातल्या नागरिकांचाही मृतांमध्ये समावेश आहे. दीवमध्ये राहणारा एक प्रवासी या दुर्घटनेतून वाचला आहे. दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल संध्याकाळी दुर्घटना स्थळाला भेट दिली; तसंच नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासमवेत बैठक घेऊन मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना अमित शहा म्हणाले....

**घटना से पूरा देश शुद्ध है और पूरा देश एक साथ पूर्ण संवेदनाओं के साथ ये जो दुर्भाग्यपूर्ण हादसे में पैसेंजर हताहत हुए हैं इनके परिजनों के साथ खड़ा है। एक यात्री का बचने का अच्छा समाचार मिला है। मैं उनको मिलकर आया हूँ मृत्यु। आंकड़ा तो डीएनए परीक्षण और यात्रियों की पहचान के बाद ही अथॉरिटी अधिकृत रूप से घोषित करेगी। एविएशन डिपार्टमेंट ने अपनी जाँच शुरू कर दी है और जांच तेजी से आगे बढ़े इसके लिए भी एविएशन मंत्री जी ने सूचनाएं दी है।**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे तसंच नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीही या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेबद्दल जगभरातून शोक व्यक्त होत आहे. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी पीडितांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला आहे, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ही एक भयानक दुर्घटना असल्याचं म्हटलं आहे. ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. फ्रांस, रशिया, युक्रेन, मालदिव, कॅनडा, सिंगापूर या देशांच्या प्रमुखांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र सहवेदना व्यक्त केली आहे.

**रेल्वे-मुंबई**

गुजरातमधील विमान अपघात दुर्घटनेमुळे प्रवासी आणि त्यांच्या नातेवाईकांच्या प्रवासाच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे अहमदाबाद - मुंबई आणि अहमदाबाद-नवी दिल्ली अशी विशेष रेल्वे चालविणार आहे. दरम्यान, 12 ते 14 जून दरम्यानच्या प्रवासाची तारिख बदलायची असेल किंवा तिकीट रद्द करायचं असेल तर कुठलंही शुल्क न आकारण्याचा निर्णय एअर इंडियानं जाहीर केला आहे.

काल दुपारी 1 वाजून 39 मिनिटांनी या विमानानं उड्डाण केल्यानंतर लगेचच विमानाच्या वैमानिकानं 'मेडे'चा संदेश पाठवला होता, ज्यामध्ये विमानाच्या परिस्थितीबाबत अनिश्चिततेचा इशारा देण्यात आला होता. वैमानिक सुमित सभरवाल आणि फर्स्ट ऑफिसर क्लाईव्ह कुंदर यांच्या नेतृत्वाखाली या विमानाने उड्डाण केलं होतं. सभरवाल यांना 8200 तासांचा तर कुंदर यांना अकराशे तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. या पार्श्वभूमीवर अपघाताची चौकशी केली जात आहे. विमान निर्माता बोईंग कंपनी एअर इंडियाच्या संपर्कात असल्याचं कंपनीनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या अपघातानंतर काल बोईंग कंपनीचे शेअर्स 4 टक्क्यांहून अधिक घसरले.

**इस्त्रायल**

इस्त्रायली हवाई दलाने काल रात्री इराणवर हवाई हल्ले केले. इराणची राजधानी तेहरानमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आले, अशी माहिती इराणच्या वृत्तसंस्थेनं दिली. इराणच्या अण्वस्त्र असलेल्या ठिकाणांना आणि लष्करी स्थळांना लक्ष्य केले असल्याचं इस्त्रायली संरक्षण मंत्री इस्त्रायल काट्झ यांनी म्हटलं आहे. इस्त्रायलने देशभरात विशेष आणीबाणी जाहीर केली असून आज इस्त्रायलमध्ये शाळा बंद राहतील. अशी माहिती इस्त्रायली संरक्षण मंत्र्यांनी दिली.

**अमेरिकी-भारतीय**

अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांना योग्य ती सुरक्षा खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. लॉस एंजेलिसमधील परिस्थितीबद्दल काल नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी हे आवाहन केलं. सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय वाणिज्य दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संपर्कात आहे, असंही ते म्हणाले.

**रशिया-युक्रेन**

रशिया आणि युक्रेनदरम्यान युध्दबंदींची सुटका करण्याचा दुसरा टप्पा काल पुर्ण झाला. यामध्ये आजारी असलेले बंदी, युध्दामुळे गंभीर जखमी झालेल्या सैन्यदलातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. युक्रेनच्या सशस्त्र दलांच्या, राष्ट्रीय गार्डच्या आणि सीमा सुरक्षा दलाच्या सैनिकांना मुक्त करण्यात आलं असल्याची माहिती युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेंस्की यांनी दिली. तर रशियाच्या एका समूहाचे सैनिक युक्रेनच्या कैदेतून परत आले आहेत आणि ते बेलारूसमध्ये वैद्यकीय देखरेखीखाली असल्याचं रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे. इस्तंबूलमध्ये झालेल्या करारांनुसार युद्ध कैद्यांची ही देवाण घेवाण सुरू आहे. दोन्ही देशांनी गंभीरपणे जखमी असलेल्या सैनिकांची आणि 25 वर्षांखालील सैनिकांची देवाण-घेवाण करण्यावर सहमति दर्शवली होती.

**एनआयए**

अमृतसरमध्ये एका पोलीस ठाण्यावर काही दिवसांपुर्वी झालेल्या ग्रेनेड हल्ला प्रकरणी पंजाब आणि हरयाणातील बब्बर खालसा आंतरराष्ट्रीय दहशथवादी संघटनेशी संबंधित विविध ठिकाणांवर राष्ट्रीय तपास संस्था अर्थात NIA ने काल छापे टाकले, अशी माहिती निवेदनाद्वारे देण्यात आली आहे. अमृतसर, तरन तारण, फेरोज़पुर, पठाणकोट, कपूरथला, आणि रुपनगर जिल्ह्यात पंजाबमध्ये तसेच हरियाणात सिरसामध्ये 15 ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. यावेळी, अनेक गुन्ह्यांसाठी वापरात येणारी सामग्री, मोबाइल फोन, डिजिटल उपकरणे, आणि इतर दस्तऐवज जप्त करण्यात आला. गुमताला पोलीस चौकीवर ग्रेनेड हल्ला झाला होता. या हल्ल्याची जबाबदारी BKI च्या परदेशात असलेल्या हॅपी पासियनने घेतली आहे.

**<u>आयएसएसएफ</u>**

जर्मनीतील म्युनिक इथं झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत भारतीय नेमबाज सिफ्ट कौर समराने काल महिलांच्या 50 मीटर रायफल 3 पोझिशन स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. 23 वर्षीय सिफ्टने अंतिम फेरीत 453 पुर्णांक 1 गुण मिळवत तिसरे स्थान पटकावलं.

**<u>FIH हॉकी प्रो लीग</u>**

नेदरलँडमध्ये FIH हॉकी प्रो लीगच्या काल झालेल्या सामन्यात अर्जेन्टिनानं भारताचा 1-2 अशा गुणांनी पराभव केला. भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंग बोटाच्या जखमेच्या कारणास्तव सामन्यात सहभागी होऊ न शकल्यानं उपकर्णधार हार्दिक सिंगनं या सामन्याचं नेतृत्व केलं. या सामन्यात भारत आता 15 गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. भारताचा पुढील सामना उद्या ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. दरम्यान, सामन्यापूर्वी दोन्ही संघांनी काल अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमानाच्या अपघातातल्या मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एक मिनिटाची शांतता पाळली.

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी करंडक विश्वचषक कसोटी क्रिकेट स्पर्धेतील लंडनमध्ये सुरू असलेल्या अंतिम सामन्यात कालच्या दुसऱ्या दिवशी दक्षिण अफ्रिकेविरुध्द ऑस्ट्रेलियानं 218 धावांची आघाडी घेतली आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियानं 8 गडी बाद 144 धावा केल्या होत्या. तत्पूर्वी, पहिल्या डावात, दक्षिण आफ्रिकेचा संघ 138 धावांवर गारद झाला होता, ज्यामध्ये ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने सहा बळी घेतले होते.

**<u>पाऊस</u>**

कर्नाटकातील अनेक भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. किनारपट्टीलगतचा भाग, उत्तरेकडील बेळगावी, धारवाड, गडग, हवेरी, दक्षिण अंतर्गत प्रदेशातील चिकमंगलूर, कोडगू, शिवमोगा आणि दावणगेरे इथं जोरादार वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला.

महाराष्ट्रातही पुणे कोल्हापूर सांगलीसह विविध जिल्ह्यात काल जोरदार पाऊस पडला. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, गोवा आणि महाराष्ट्रात येत्या 24 तासात तुरळक ठिकाणी अतिजोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तुरळक ठिकाणी ताशी 60 ते70 किलोमीटर इतक्या वेगाने वारे वाहतील असा इशाराही देण्यात आला आहे. ईशान्येकडील राज्यातही पावसाचा अंदाज आहे. दरम्यान, दिल्ली, पंजाब, हरियाणा, चंदिगड, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेशात उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.